बहुतांच्या कामास यावे ।
बहुतांच्या सुखी सुखावे ॥

महाराष्ट्र शासन
धाराशिव जिल्हा परिषद, धाराशिव
जिल्हाधिकारी कार्यालयासमोर, सोलापूर-छत्रपती संभाजीनगर राज्य महामार्ग क्र.211,धाराशिव 413501
दूरध्वनी 02472-226840 ईमेल ceozpdharashiv@gmail.com, CEOZP.dharashiv@maharashtra.gov.in वेब https://www.zposmanabad.gov.in

जा.क्र.जिपधा.मुकाअ.स्वीय.82 दिनांक 12.02.2024

**नस्ती सादर करतांना घ्यावयाचे दक्षतेबाबत.**

**परिपत्रक**

जिल्हा परिषद अंतर्गत येणा-या विभागामार्फत विविध विषयांवरील नस्ती माझ्याकडे मंजुरीकरीता प्राप्त होतात. सदरची नस्ती/टिपणी/फाईल मोघम स्वरुपाच्या सादर न करता नस्तीवरील अभिप्राय हे वस्तुस्थितीस अनुसरुन शासन निर्णयाप्रमाणेच असावेत.

त्यानुसार माझेकडे नस्ती/टिपणी सादर करतांना खालीलप्रमाणे दक्षता घ्यावी.

- नस्ती/टिपणी/प्रस्ताव यावर खातेप्रमुखासह संबंधित कार्यासन प्रमुख व पर्यवेक्षकीय अधिकारी यांनी नस्ती/प्रस्ताव मंजुर करण्यास हरकत आहे किंवा नाही याबाबत स्पष्ट अभिप्राय द्यावे. केवळ स्वाक्षरी करुन नस्ती सादर करण्यात येऊ नये.
- नस्ती/टिपण/प्रस्ताव सादर करतांना ती ज्या विषयाची आहे, त्यासंबंधित अलीकडील शासन निर्णय, परिपत्रक, अधिनियम, नियम, मार्गदर्शक सूचना या नस्तीस संलग्न कराव्यात. संदर्भास व आवश्यक दस्ताऐवजांस अनुक्रमांक नोंदवुन त्यास पताका लावण्यात यावे.
- नस्ती मंजुर करण्याबाबत आवश्यक नियम, पोटनियम स्पष्ट नमुद असावा. संदर्भामधील दस्ताऐवजामध्ये तो अधोरेखीत केला असावा.
- नस्ती ला पान क्रमांक देण्यात यावे व आवश्यक समास सोडण्यात यावा.
- नस्ती सादर करणारा अधिकारी/कर्मचारी यांनी नाव, पदनाम व दिनांक नमूद करावा.
- नस्ती/टिपणी/प्रस्ताव सादर करतांना नस्तीस विभाजक असावे.
- निर्णायक नस्तीवर निर्णय घेणे/ कार्यवाही करणे असतांना त्याबाबत सदरच्या नस्तीवर संबंधित कार्यासन प्रमुख, पर्यवेक्षिय अधिकारी व खाते प्रमुख यांचे अभिप्रायावर निर्णय घेता येतो किंवा नाही व कार्यवाही करणे उचित राहील किंवा नाही याबाबत मत न नोंदविता शासन संदर्भासह स्वयंस्पष्ट अभिप्राय नोंदविण्यात यावे.

पत्रक पाठवले
दिनांक 12/2/24
सही

(डॉ.मैनक घोष) भा.प्र.से.
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
जिल्हा परिषद, धाराशिव

प्रतिलिपी :-

➢ सर्व खाते प्रमुख, जिल्हा परिषद, धाराशिव यांना माहिती तथा कार्यवाहीस्तव देण्यात येते.

***